आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
५ फेब्रुवारी २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभारप्रस्ताव आज लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर

- आभारप्रस्तावावरच्या चर्चेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज राज्यसभेत उत्तर देणार

- ॲप-आधारित वाहन सेवा देणारी सुविधा 'भारत टॅक्सी' चं उद्घाटन केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते

- महाराष्ट्रात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठीचा प्रचाराचा आज शेवटचा दिवस

**आणि**

- १९ वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये भारताचा अंतिम फेरीत प्रवेश

**<><><><><>**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभारप्रस्ताव आज लोकसभेनं आवाजी मतदानाने मंजूर केला. राष्ट्रपतींनी २८ जानेवारीला संसदेच्या दोन्ही सभागृहाला संबोधित केलं होतं. आभारप्रस्ताव मंजुरीचा प्रस्ताव भाजपा खासदार सर्बानंद सोनोवाल यांनी मांडला त्याला तेजस्वी सूर्या यांनी अनुमोदन दिलं.

त्याआधी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या घोषणाबाजीमुळे आज लोकसभेचं कामकाज आधी दुपारी बारा आणि नंतर दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

सभागृहाचं आजचं कामकाज सुरू झाल्यावर सभापती ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षाच्या सदस्यांच्या कालच्या वर्तनावर नापसंती व्यक्त केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या आभारप्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देणार होते, मात्र भाषण सुरू होण्यापूर्वीच विरोधी पक्षाचे सदस्य घोषणाबाजी करत सत्ताधारी बाकांकडे धावले. हे वर्तन सभागृहाच्या मर्यादेचं उल्लंघन असल्याचं सभापती म्हणाले. आज दिवसाच्या सुरुवातीला प्रश्नोत्तराचा तास सुरू झाल्यावर सभागृहात गदारोळ वाढत गेल्यामुळे सभापतींनी कामकाज बारा वाजेपर्यंत तहकूब केलं. तसंच दुसऱ्यांदा कामकाज सुरू झाल्यावरही गदारोळ सुरूच राहिल्याने कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

<><><><>

राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावरच्या चर्चेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज राज्यसभेत उत्तर देतील, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. प्रधानमंत्री काल लोकसभेत हे उत्तर सादर करणार होते, मात्र सभागृहात गदारोळ वाढत गेल्याने कामकाज तहकूब करण्यात आलं होतं.

राज्यसभा हे एकच सभागृह नसून लोकसभा आणि राज्यसभा मिळून संसद बनते. असं म्हणत प्रधानमंत्र्यांनी केवळ राज्यसभेत भाषण करण्याला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आक्षेप घेतला. यावर सर्व सदस्यांना प्रधानमंत्र्यांचं भाषण ऐकण्याची इच्छा आहे मात्र काँग्रेसला नाही असं प्रत्युत्तर मंत्री किरेन रिजिजू यांनी दिलं.

राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जून खरगे यांना सभागृहात माजी लष्करप्रमुख एम एम नरवणे यांच्या पुस्तकातला मजकूर वाचून दाखवायची परवानगी नाकारण्यात आली. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला.

<><><><>

पर्यावण संरक्षण नियमांचं उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांना पूर्वलक्ष्यी प्रभावाने मंजुरी देण्यासंदर्भातल्या याचिकांवर नव्याने सुनावणी करण्यासाठी वेगळं पीठ

स्थापन करावं, अशी मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. गेल्या वर्षी १८ नोव्हेंबर रोजी तत्कालीन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठाने दोनास एक अशा बहुमताने अशी मंजुरी देण्याचा मार्ग मोकळा केला होता. मात्र, आता नव्याने या प्रकरणी पीठाच्या स्थापनेची मागणी करण्यात आली. या मागणीसंदर्भात विचार करून निर्णय देण्यात येईल, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

ॲप-आधारित वाहन सेवा देणारी सुविधा 'भारत टॅक्सी' चं उद्घाटन केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत होणार आहे. हा भारताचा पहिला सहकारी-आधारित राईड-हेलिंग प्लॅटफॉर्म आहे. अशी माहिती सहकार मंत्रालयानं काल दिली. भारत टॅक्सीची संकल्पना दळणवळण क्षेत्रातील एक परिवर्तनकारी उपक्रम ठरेल, सेवा देणाऱ्या चालकाला सारथी या नावाने संबोधले जाईल आणि सारथी हाच मालक या संकल्पनेवर आधारित परिचालन आणि मूल्य निर्मितीच्या केंद्रस्थानी असेल. याद्वारे 'बाईक दीदी' सारखे उपक्रम राबवले जात असून आतापर्यंत दीडशेहून अधिक महिला चालक भारत टॅक्सीमध्ये सहभागी झाल्या आहेत.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आजपासून जम्मू आणि काश्मीरच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात ते सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित यंत्रणांबरोबर आढावा बैठक घेतील, विकास प्रकल्पांचं मूल्यांकन करतील आणि विविध स्तरावरच्या नेत्यांशी संवाद साधतील. उद्या सकाळी कठुआ जिल्ह्यात हिरानगर परिसरात आंतरराष्ट्रीय सीमेलाही ते भेट देतील आणि सीमेपलीकडून होणारी

घुसखोरी रोखण्यासाठी सीमा सुरक्षा दलाकडून बसवण्यात आलेल्या नवीन उपकरणांची पाहणी करतील.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या बिजापूर जिल्ह्यात आज सकाळी सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत एक नक्षली अतिरेकी ठार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांना या नक्षलवाद्याचा मृतदेह सापडला असून त्याच्या जवळून एक AK 47 रायफल जप्त करण्यात आली आहे. या भागात सशस्त्र नक्षलवादी वावरत असल्याची खबर मिळाल्यावरून सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकानं ही शोध मोहीम सुरु केली आहे.

<><><><><>

केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल येत्या बुधवारी दुबईमध्ये आयोजित जागतिक शासन शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. त्या ‘धोरण - ते - अंमलबजावणी - भविष्यातल्या समावेशक उपचार पद्धतीत गुंतवणूक’ या सत्रात मार्गदर्शनही करणार आहेत. या परिषदेच्या माध्यमातून भारताला आपला समावेशक उपचार पध्दतीबाबतचा दृष्टिकोन जगासमोर मांडण्याची संधी मिळणार आहे, असं पटेल यांनी प्रसार भारतीला दिलेल्या विशेष मुलाखतीत सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा प्रचार आज संपत आहे. येत्या शनिवारी सात तारखेला मतदान होणार असून, नऊ तारखेला मतमोजणी होईल. या निवडणुकांसाठी मतदारांना आपलं नाव आणि मतदान केंद्र सहज शोधता यावं, यासाठी राज्य निवडणूक आयोगाने माताधिकार हे मोबाईल ॲप उपलब्ध करून दिलं आहे.

<><><><><>

चर्म निर्यात परिषदेने भारत- अमेरिका व्यापार कराराचं स्वागत केलं असून चर्मोद्योग क्षेत्रालाही या कराराचा फायदा होईल, असं म्हटलं आहे. चर्मोद्योगाला पुनरुज्जीवन मिळायला या करारामुळे मदत होईल, असं परिषदेचे भारतातले अध्यक्ष असद इराकी म्हणाले.

<><><><><>

जम्मू काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात सुरक्षा दलांच्या कारवाईत एक दहशतवादी मारला गेला. या भागात संशयित दहशतवादी लपले असल्याची खबर मिळाल्यानंतर शोध मोहीम सुरू होती. त्यावेळी दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केल्यानंतर सुरक्षा दलांनी दिलेल्या प्रत्युत्तरात एक दहशतवादी मारला गेला.

<><><><><>

मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर मुंबईकडे जाणारी वाहतूक तब्बल ३३ तासानंतर पुन्हा सुरळीत सुरु झाली आहे. खंडाळा घाटात मंगळवारी मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर आडोशी बोगद्याजवळ ज्वलनशील वायू घेऊन जाणारा एक टँकर पलटल्यानं वाहतूक खोळंबली होती. यामुळे रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. वाहनात अडकलेले प्रवासी, महिला आणि लहान मुले यांची गैरसोय झाली. यावेळी दूध आणि भाजीपाल्याची वाहतूक करणारे ट्रक देखील अडकून पडल्यानं जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर परिणाम झाला. अपघातग्रस्त टँकरमधला वायू आणि टँकर महामार्गावरून हटवल्यानंर वाहतूक सुरु झाली.

<><><><><>

क्रिकेटमध्ये १९ वर्षाखालच्या युवकांच्या विश्वचषक स्पर्धेत काल हरारे इथं झालेल्या उपांत्य सामन्यात अफगाणिस्तानवर ७ गडी राखून मात करत भारतानं

अंतिम फेरी गाठली. अफगाणिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि शतकवीर फैजल शिनोजादाच्या ११०, आणि उजैरुल्ला नैजलच्या १०१ धावांच्या जोरावर, निर्धारित ५० षटकात ४ गडी गमावून ३१० धावा केल्या. भारतानं ३ गड्यांच्या मोबदल्यात सामन्यातले ५३ चेंडू बाकी असताना ही धावसंख्या पार केली.  आरोन जॉर्जनं ११५ धावा केल्या. तो सामन्यातला सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला. वैभव सूर्यवंशीनं ३३ चेंडूत ६८, कर्णधार आयुष म्हात्रेनं ६२, तर विहान मल्होत्रानं नाबाद ३८ धावांचं योगदान दिलं.विजेतेपदासाठी भारताची लढत उद्या इंग्लंडबरोबर होईल.

**<><><><><>**

ओदिशामधल्या बिरसा मुंडा आंतरराष्ट्रीय हॉकी स्टेडियम मध्ये  १० ते १५ फेब्रुवारी दरम्यान होणार असलेल्या एफ आय एच प्रो लीग स्पर्धेसाठी हॉकी इंडिया संघटनेनं २४ खेळाडूंच्या पुरुष संघाची निवड  केली आहे. या संघात नव्या दमाच्या उमद्या खेळाडूंसह अनुभवी खेळाडूंचाही  समावेश आहे. या स्पर्धेत अर्जेंटिना तसंच बेल्जीयम सारखे बलाढ्य हॉकी संघ सहभागी होणार असल्यानं भारतीय संघापुढं मोठं आव्हान असणार आहे. या स्पर्धेतला भारताचा पहिला सामना १४ फेब्रुवारीला बेल्जीयम विरुद्ध होणार आहे.

**<><><><><>**

महिला  क्रिकेटमधे प्रिमीयर लीगचा अंतिम सामन्यात आज गतविजेते दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांची लढत होणार आहे. बडोदा इथं साडेसातवाजता सामना सुरु होईल. यंदाच्या महिला प्रीमीयर लीग करता भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं  सुमारे १० कोटी रुपयांची बक्षिसं घोषित केली आहेत.

**<><><><><>**

गोवा पुस्तक महोत्सवाला काल पणजीमध्ये सुरवात झाली. साहित्य आणि संस्कृती यांचा अनोखा संगम असलेल्या या महोत्सवाचं उद्घाटन गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते झालं. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात 200 हून अधिक प्रकाशक इंग्रजी, कोकणी, मराठी आणि हिंदी भाषेतली पुस्तकं घेऊन दाखल झाले आहेत.

**<><><><><>**

देशभरात विविध ठिकाणी झालेल्या अपघातात कालपासून ६ जणांचा मृत्यू झाला तर किमान  १४ जण जखमी झाल्याचं वृत्त आहे.

कर्नाटकच्या गदग जिल्ह्यात रोण तालुक्यात आज पहाटे झालेल्या रस्ते अपघातात ३ महिलांचा मृत्यू झाला तर १४ हुन अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत. मजुरांना घेऊन जाणाऱ्या चार चाकी वाहनाची आणि एका ट्रकची धडक झाल्यानं हा अपघात घडला. उत्तर प्रदेशातल्या नोएडा जिल्ह्यात विविध ठिकाणी झालेल्या रस्ते अपघातात  ३ जणांचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

आकाशवाणीच्या माजी वृत्तनिवेदक आणि भाषांतरकार रविंदर सभरवाल यांचं आज नवीदिल्ली इथं प्रदीर्घ आजारानंतर निधन झालं. १९८५ ते २०१२ या काळात त्या आकाशवाणीच्या वृत्त सेवा विभागात कार्यरत होत्या.

**//<><><><><>//**